# महाराष्ट्र शासन

## विधी व न्याय विभाग

## भारतीय बाष्पक अधिनियम, १९२३

( १९२३ चा अधिनियम ५ )

# भारतीय बाष्पक अधिनियम, १९२३.

## अनुक्रमणिका


| कलम | कलमांचा क्रम |
|---|---|
| १ | संक्षिप्त शीर्षक, विस्तारक्षेत्र व प्रारंभ. |
| २ | व्याख्या. |
| २अ | भरण नलिकांना अधिनियम लागू करणे. |
| २ब | मितोपयोजकांना अधिनियम लागू करणे. |
| ३ | लागू करण्याची मर्यादा. |
| ४ | विस्तारक्षेत्र मर्यादित करण्याची शक्ती. |
| ५ | मुख्य निरीक्षक, उपमुख्य निरीक्षक व निरीक्षक. |
| ६ | नोंदणी न झालेल्या किंवा प्रमाणित नसलेल्या बाष्पकांचा वापर करण्याबाबत प्रतिषेध. |
| ७ | नोंदणी. |
| ८ | प्रमाणपत्राचे नवीकरण. |
| ९ | तात्पुरती प्रमाणपत्रे. |
| १० | प्रमाणपत्र देईपर्यंत बाष्पकाचा वापर करता येणे. |
| ११ | प्रमाणपत्र किंवा तात्पुरता आदेश परत घेणे. |
| १२ | बाष्पकातील फेरफार व नवीकरण. |
| १३ | बाष्पनलिका मधील फेरफार व नवीकरण. |
| १४ | तपासणीच्या वेळेचे मालकाचे कर्तव्य. |
| १५ | प्रमाणपत्रे वगैरे दाखल करणे. |
| १६ | प्रमाणपत्रे वगैरेचे हस्तांतरण. |
| १७ | प्रवेश करण्याबाबतचा अधिकार. |
| १८ | अपघाताबाबत प्रतिवेदन देणे. |
| १९ | मुख्य निरीक्षकाकडे अपील करणे. |
| २० | अपील प्राधिका-याकडे अपील करणे. |
| २०अ | अपील प्राधिका-याच्या आदेशात सुधारणा करण्याची केंद्र शासनाची शक्ती. |
| २१ | आदेशांची अंतिमता. |
| २२ | किरकोळ शास्ती. |

| | |
|---|---|
| २३ | बाष्पकाचा अवैधरीत्या वापर करण्याबद्यल शास्ती. |
| २४ | इतर शास्ती. |
| २५ | नोंदणी चिन्हात बदल करण्याबाबत शास्ती. |
| २६ | अभियोगांबाबतची मर्यादा व त्यासाठी पूर्वमंजुरी |

भारतीय बाष्पक अधिनियम, १९२३

कलमांचा क्रम

कलमे

१. संक्षिप्त शीर्षक, विस्तारक्षेत्र व प्रारंभ
२. व्याख्या
२अ. भरणा नलिकांना अधिनियम लागू करणे.
२ब मितोपयोजकांना अधिनियम लागू करणे.
३. लागू करण्याची मर्यादा.
४. विस्तारक्षेत्र मर्यादित करण्याची शक्ती.
५. मुख्य निरीक्षक, उपमुख्य निरीक्षक व निरीक्षक
६. नोंदणी न झालेल्या किंवा प्रमाणित नसलेल्या बाष्पकांचा वापर करण्याबाबत प्रतिषेध.
७. नोंदणी
८. प्रमाणपत्राचे नवीकरण.
९. तात्पुरती प्रमाणपत्रे.
१०. प्रमाणपत्र देईपर्यंत बाष्पकाचा वापर करता येणे.
११. प्रमाणपत्र किंवा तात्पुरता आदेश परत घेणे.
१२. बाष्पकातील फेरफार व नवीकरण.
१३ बाष्पनलिका मधील फेरफार व नवीकरण.
१४. तपासणीच्या वेळेचे मालकाचे कर्तव्य.
१५. प्रमाणपत्रे वगैरे दाखल करणे.
१६. प्रमाणपत्रे वगैरेचे हस्तांतरण.

१७ प्रवेश करण्याबाबतचा अधिकार.
१८. अपघाताबाबत प्रतिवेदन देणे.
१९. मुख्य निरीक्षकाकडे अपील करणे.
२०. अपील प्राधिका-याकडे अपील करणे.
२०अ.अपील प्राधिका-याच्या आदेशात सुधारणा करण्याची केंद्र शासनाची शक्ती.
२१. आदेशांची अंतिमता.
२२ किरकोळ शास्ती.
२३. बाष्पकाचा अवैधरीत्या वापर करण्याबद्यल शास्ती.
२४. इतर शास्ती.
२५. नोंदणी चिन्हात बदल करण्याबाबत शास्ती.
२६. अभियोगांबाबतची मर्यादा व त्यासाठी पूर्वमंजुरी.

**दुरुस्ती अधिनियम व अनुकूलन यांची यादी.**

१. निरसन अधिनियम, १९२७ (१९२७ चा अधिनियम क्रमांक १२)
२. भारतीय बाष्पक (दुरुस्ती) अधिनियम, १९२९ (१९२९ चा अधिनियम क्रमांक ९).
३. भारत सरकार (भारतीय विधींचे अनुकूलन) आदेश, १९३७.
४. भारतीय बाष्पक (दुरुस्ती) अधिनियम, १९३७ (१९३७ चा अधिनियम क्रमांक ११).
५. निरसन व दुरुस्ती अधिनियम, १९३९ (१९३९ चा अधिनियम क्रमांक ३४).
६. भारतीय बाष्पक (दुरुस्ती) अधिनियम, १९४२ (१९४२ चा अधिनियम क्रमांक ५).
७. भारतीय बाष्पक (दुरुस्ती) अधिनियम, १९४३ (१९४३ चा अधिनियम क्रमांक १७).
८. भारतीय बाष्पक (दुरुस्ती) अधिनियम, १९४७ (१९४७ चा अधिनियम क्रमांक ३४).
९. भारतीय स्वातंत्र (केंद्रीय अधिनियमाचे अनुकूलन व अध्यादेश) आदेश, १९४८.
१०. विधि अनुकूलन आदेश, १९५०.
११. भाग व राज्ये (विधि) अधिनियम, १९५१ (१९५१ चा अधिनियम क्रमांक ३).
१२. भारतीय बाष्पक (दुरुस्ती) अधिनियम, १९५१ (१९५१ चा अधिनियम क्रमांक ३८).
१३. भारतीय बाष्पक (दुरुस्ती) अधिनियम, १९५२ (१९५२ चा अधिनियम क्रमांक २५).
१४. निरसन व दुरुस्ती अधिनियम, १९५२ (१९५२ चा अधिनियम क्रमांक ४८).
१५. विधि अनुकूलन (क्रमांक ३) आदेश, १९५६.
१६. भारतीय बाष्पक (दुरुस्ती) अधिनियम, १९६० (१९६० चा अधिनियम क्रमांक १८).

भारतीय बाष्पक अधिनियम, १९२३.
१९२३ चा अधिनियम क्रमांक - ५,

# भारतीय बाष्पक अधिनियम, १९२३.

( २३ फेब्रुवारी १९२३ )

बाष्पकासंबधीचा विधि एकत्रित करणे व त्यात सुधारणा करणे याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, बाष्पकासंबंधीचा विधी एकत्रित करणे व त्यात सुधारणा करणे इष्ट आहे, त्याअर्थी, याव्दारा पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :-

१. (१) हया अधिनियमास भारतीय बाष्पक, अधिनियम, १९२३ असे म्हणता येईल.

(२) ( जम्मू व काश्मीर राज्य वगळून ) संपूर्ण भारत हे त्याचे विस्तारक्षेत्र राहील.

(३) तो, केद्र शासन राजपत्राात प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेव्दारा निर्दिष्ट करील अशा तारखेस अंमलात येईल.

२. विषयात किंवा संदर्भात एताविरुध्द काही नसल्यास हया अधिनियमातः-

(अ) "अपघात" म्हणजे, बाष्पक किंवा बाष्पनलिकेचा स्फोट किंवा बाष्पक वा बाष्पनलिका यांची कुवत कमी होऊन ज्यामुळे त्यात स्फोट होण्याची शक्यता निमार्ण होईल अशा स्वरुपाचे कोणतेही बाष्पकाचे किंवा बाष्पनलिकेचे झालेले नुकसान.

( अअ) "मंडळ" म्हणजे, कलम २७ - अ अन्वये प्रस्थापित केलेले केंद्रीय बाष्पक मंडळ,)

(ब) "बाष्पक" म्हणजे ( २२. ७५ लिटर ) पेक्षा अधिक धारणक्षमता असलेल्या ज्या बंद पात्राचा . ......... दाबाखाली विशेषेकरुन बाष्पर्नितीसाठी उपयोग करण्यांत येतो असे कोणतेही बंदपात्र, आणि या संज्ञेत, अशा पा्त्रास जोडलेले जे आवरण किंवा इतर जोडकाम वाफ बंद केली असता अंशतः किंवा पूर्णतः वाफेच्या दाबाखाली असते त्या आवरणाचा किंवा जोडकामाचा अंतर्भाव होंईल.

(क) "मुख्य निरीक्षक", "उप-मुख्य निरीक्षक" आणि "निरीक्षक," म्हणजे, हया अधिनियमान्वये, अनुक्रमे, मुख्य निरीक्षक, उप-मुख्य निरीक्षक व निरीक्षक म्हणून नियुक्त केलेली व्यक्ती.

(कक) "मितोपयोजक" म्हणजे, वाया जाणा-या उष्णतेचा पुन्हा उपयोग करुन घेण्यासाठी ज्वलनवायुच्या प्रकियेत पूर्णतः किंवा अंशतः उत्सार्गेत असा भरणनलिकेचा कोणताही भाग.

१. उद्देश व कारणे यांच्या विवरणप्त्रासाठी, पहा, भातीय राजपत्र, १९२३, भाग ५, पृष्ठ २४९, व संयुक्त समितीच्या अहवालासाठी, पहा, भारतीय राजपत्र १९२३, भाग ५, पृष्ठ १७.

२. हे पोट-कलम विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये पूर्वीच्या कलमाऐवजी दाखल करण्यांत आले.

३. हे शब्द, १९७१ चा अधिनियम ३, कलम ३ व अनुसूचीनुसार भाग ब मधील राज्य व्यतिरिक्त या शब्दाऐवजी दाखल करण्यांत आले.

४. १ जानेवारी १९२४, पहा अधिसूचना कमांक अ-६१, दिनांक- ४ डिसेंबर १९२३, पहा, भारतीय राजपत्र, १९२३, भाग १ पृष्ठ १६९७.

५. हे पोट-कलम, १९३७ चा अधिनियम ११, कलम ३ अन्वये, दाखल करण्यांत आले.

६. १९६० चा अधिनियम कमांक १८, कलम २ अन्वये हे शब्द व आकडे ५ गॅलन्स या शब्दाऐवजी दाखल करण्यांत आले.

७. १९२९ या अधिनियम कमांक ९, कलम २ अन्वये अशा पात्राबाहेरच्या उपयोगासाठी हे शब्द वगळण्यांत आले.

८. हा खंड, १९६० चा अधिनियिम कमांक १८, कलम २ अन्वये खंड (क) ऐवजी दाखल करण्यांत आला.‘

९. हा खंड, १९४३ चा अधिनियम कमांक १७, कलम २ अन्वये दाखल केलेला पूर्वीचा खंड (कक) ऐवजी १९४९ चा अधिनियम कमांक ४०, कलम ३, ”अनुसूची“ २

नुसार दुरुस्त केल्याप्रमाणे १९४७ चा अधिनियम कमांक ३४, कलम २ अन्वये दाखल करण्यांत आला.

( ककक ) ”भरणनलिका“ म्हणजे, पूर्णतः किंवा अंशतः दाबाखाली असलेल्या ज्या नलिकेतून किंवा जोडणीतून बाष्पकात पाणी सरळ प्रवाहित करण्यांत येते व जी बाष्पाकाचा घटक भाग असत नाही अशी कोणतीही नलिका किंवा जोडणी.

(ड) ”मालक“ म्हणजे, मालकाचा प्रतिनिधी या नात्याने बाष्पकाचा वापर करणारी कोणतीही व्यक्ति, तसेच या संज्ञेत, बाष्पकाचा मालकाकडून भाडयाने किंवा उसनवारीवर घेतलेल्या बाष्पकाचा वापर करणा-या कोणत्याही व्यक्तीचा अंतर्भाव होईल;

(इ)” विहीत“ म्हणजे, हया अधिनियमान्वये केलेले विनियम किंवा नियम किंवा नियम यान्वये विहित केलेले;

(फ) ” बाष्प नलिका “ म्हणजे, बाष्पकामधून ज्या नलिकेव्दारा वाफ मुलगतिजनकाकडे ( Prime mover ) किंवा इतर उपयोगकत्यकिडे किंवा दोन्हीकडे, पुढील परिस्थितील प्रवाहीत होते ती नलिका, म्हणजे, --

(१) अशा नलिकेतून ज्या दाबाखाली वाफ प्रवाहित होते तो दाब जर, वातावरणाच्या दाबापेक्षा दर चौरस सेंटिमीटरला ३.५ किलोग्रॅम्सहून अधिक असेल तर; किंवा

(२) जर अशा नलिकेचा अतिरिक व्यास २५४ मिलीमीटरपेक्षा अधिक असेल तर; आणि या संज्ञेत, दोन्ही बाबतीत बाष्पनलिकेस जोडण्यांत आलेल्या कोणत्याही जोडणीचा अंतर्भाव होतो ;

(ग) " संरचनात्मक फेरफार, भर किंवा नवीकरण " यात, पुनःस्थापना करताना उपयोगात आणलेला भाग किंवा जोडणी ही, मजबूती कार्यक्षमता किंवा इतर बाबतीत पुनःस्थापित करावयाचा भाग किंवा जोडणी यापेक्षा निकृष्ट दर्जाचा नसेल तर, कोणतेही किरकोळ स्वरुपाचे नवीकरण किंवा पुनःस्थापन यांचा अंतर्भाव होत असल्याचे समजले जाणार नाही.

२ (२अ, जेथे कलम २ च्या खंड (फ) मध्ये वापरण्यांत आलेला " बाष्प-नलिका" हा शब्द वगळता ) हया अधिनियमातील बाष्पनलिका किंवा बाष्पनलिकांच्या संबंधातील उल्लेखात अनुक्रमे भरणनलिक किंवा भरणनलिकांचा अंतर्भाव होत असल्याचे गृहीत धरण्यात येईल.)

( २ ब , ( कलम २ च्या खंड (ककक), ************ मधील बाष्पकासंबंधीचा उल्लेख वगळता ) हया अधिनियमातील बाष्पक किंवा बाष्पकासंबंधीच्या प्रत्येक उल्लेखात अनुक्रमे एक किंवा अनेक मितोपयोजक यांच्या उल्लेखांचा अंतर्भाव होत असल्याचे गृहीत धरण्यात येईल.)

३. (१) हया अधिनियमातील कोणताही मजकूर --

(अ) ६ भारतीय बाष्पक-नौका अधिनियम, १८८४ यातील कलम ३ मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही बाष्पनौकातील, किंवा अंतर्देशीय बाष्प जलयान अधिनियम, १९१७ यातील कलम २ मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही आगबोटीतील कोण्त्याही बाष्पकाच्या किंवा बाष्पनलिकेच्या बाबतीतः किंवा

(ब) सेना, नौसेना किंवा वायुसेना यांच्या मालकीच्या किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या बाष्पकाच्या किंवा बाष्पनलिकेच्या बाबतीतः किंवा.

१. हा खंड, १९६० चा अधिनियम कमांक १८, कलम २ अन्वये खंड (फ) ऐवजी दाखल करण्यात आला.

२. हे कलम १९४३ चा अधिनियम कमांक १७, कलम ३ अन्वये दाखल करण्यांत आले.

३. हे कलम, १९४७ चा अधिनियम कमांक ३४, कलम ३ अन्वये दाखल करण्यात आले.

४. " कलम ६ मधील खंड (ई), कलम ११ मधील खंड (क) व खंड (ड), कलम २९ मधील खंड (ड) " हे शब्द, कस, अक्षरे व संस्था, १९७२ चा अधिनियम कमांक २५, कलम २ अन्वये वगळण्यात आले.

५. " व कलम ३४ " हे शब्द व संस्था व संख्या १९६० चा अधिनियम कमांक १८, कलम ३ अन्वये वगळण्यात आले.

६. आता, भारतीय व्यापारी नौवहन अधिनियम, १९२३. ( १९२३ चा अधिनियम क्रमांक २१ ) कलम २ पहा.

७. हा खंड, १९७१ चा अधिनियम क्रमांक ३८, कलम २ अन्वये पुर्वीच्या खंडाऐवजी दाखल करण्यात आला.

[१](क) ज्या बाष्पकाची धारणक्षमता [२](एक्कयाण्ण्व लिटरपेक्षा) अधिक नसेल अशा सर्वसाधारणपणे रुग्णालयात वापरल्या जाणा-या निर्जन्तुकरणयंत्राशी किंवा जंतुनाशक उपकरणाशी संबंध असलेल्या कोणत्याही बाष्पकाच्या किंवा बाष्पनलिकेच्या बाबतीत) लागू होणार नाही.

(२) [३](केंद्र शासनास) राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारा [४](केंद्र शासनाच्या) [५](किंवा कोणत्याही राज्य शासनाच्या) प्रशासनाखालील रेल्वेच्या किंवा भारतीय रेल्वे अधिनियम, १८९० यातील कलम ३, खंड (५) मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही रेल्वकंपनीच्या मालकीची किंवा नियंत्रणाखाली असलेली बाष्पके किंवा बाष्पनलिका, किंवा कोणत्याही विनिर्दिष्ठ प्रकारची बाष्पके किंवा बाष्पनलिका यांच्या बाबतीत, हया अधिनियमाचे उपबंध लागू होणार नाहीत, असे जाहीर करता येईल.

[६]* * * * * * *

४. [७](राज्य शासनास) राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारा कोणताही विनिर्दिष्ट भाग हया अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही विनिर्दिष्ट उपबंधाच्या प्रवर्तनातून वगळता येईल. विस्तारक्षेत्र मर्यादित करण्याची शक्ती

[८](५. (१) राज्य शासनास, हया अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, त्यास योग्य वाटतील अशा व्यक्तींची राज्यासाठी निरीक्षक म्हणून नियुक्ती करता येईल आणि राज्य शासनास प्रत्येक निरीक्षक, हया अधिनियमान्वये किंवा तदनुसार त्यास प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा ज्या, स्थानिक मर्यादित वापर करील व त्याजवर लादलेली कर्तव्ये व कामे पार पाडील, ती स्थानिक मर्यादा निर्धारित करता येईल.) मुख्य निरीक्षक, उप-मुख्य निरीक्षक व निरीक्षक

(२) राज्य शासनास, राज्यासाठी, त्यास योग्य वाटतील अशा व्यक्तीची उपमुख्य निरीक्षक म्हणून नियुक्ती करता येईल, आणि राज्य शासनास प्रत्येक उपमुख्य निरीक्षक, हया अधिनियमाखाली त्याच्या शक्तीचा ज्या स्थानिक मर्यादेत वार करीत व त्याची कर्तव्ये व कामे पार पाडील ती स्थानिक मर्यादा निर्धारित करता येईल.

(३) प्रत्येक उपमुख्य निरीक्षकास, हया अधिनियमान्वये किंवा तदनुसार, निरीक्षकांस प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करता येईल व त्याजवर लादललेली कर्तव्ये व कामे पार पाडता येतील आणि हयाशिवाय त्यास, हया अधिनियमान्वये किंवा तद्नुसार निरीक्षकांकडे ज्या शक्ती प्रदान केलेल्या आहेत व जी कामे व कर्तव्ये सोपविलेली आहेत त्यापैकी राज्य शासन त्याजकडे ज्या शक्ती प्रदान करील त्यांचा वापर करता येईल व ती कामे व कर्तव्ये पार पाडता येतील.

(४) राज्यशासन, राज्यासाठी, मुख्य निरीक्षक म्हणून एखाद्या व्यक्तीची नियुक्ती करील. मुख्य निरीक्षकास, हया अधिनियमान्वये व तदनुसार त्यास प्रदान केलेल्या शक्ती व लादण्यात आलेली कर्तव्ये व कामे याशिवाय, उप मुख्य निरीक्षक किंवा निरीक्षक यांस प्रदान केलेल्या शक्तीचाही वापर करता येईल व त्याजवर लादलेली कर्तव्ये व कामे पार पाडता येतील.

[१] हा खंड, १९४२ चा अधिनियम क्रमांक ७, कलम २ अन्वये, दाखल करण्यात आला.

[२] हे शब्द, १९६० चा अधिनियम क्रमांक १८ कलम ४ अन्वये "वीस गॅलन्स" या शब्दाऐवजी दाखल करण्यात आले.

[३] हे शब्द, विधि अनुकूलन आदेश, १९४८ अन्वये सुरक्षितता नियंत्रण प्राधिकारी या शब्दाऐवजी दाखल करण्यात आले.

[४] हे शब्द, विधि अनुकूलन आदेश, १९४८ अन्वये "संघीय रेल्वे प्राधिकारी" या शब्दाऐवजी दाखल करण्यात आले.

[५] हे शब्द विधि अनुकूलन आदेश, १९३७ अन्वये "सरकारने" या शब्दाऐवजी दाखल करण्यात आले.

[६] विधि अनुकूलन आदेश, १९३७ अन्वये दाखल केलेल दुसरा परिच्छेद विधि अनुकूलन आदेश, १९४८ अन्वये वगळण्यात आला.

[७] "गव्हर्नर जनरल इन कौन्सिल" हे शब्द क्रमशः विधि अनुकूलन आदेश, १९३७ व विधि अनुकूलन आदेश १९५० अन्वये वरीलप्रमाणे दुरुस्त करण्यात आले.

[८] हे कलम १९६० चा अधिनियम क्र. १८, कलम ५ अन्वये कलम ५ ऐवजी दाखल करण्यात आले.

(५) हया अधिनियमाच्या उपबंधास अधीन राहून, उपमुख्य निरीक्षक व निरीक्षक, हे मुख्य निरीक्षकाच्या सर्वसाधारण अधीक्षणाखाली किंवा नियंत्रणाखाली, हया अधिनियमान्वये किंवा तदनुसार त्यास प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करतील व त्यावर लादलेली कर्तव्ये व कामे पार पाडतील.

(६) मुख्य निरीक्षक, उपमुख्य निरीक्षक व निरीक्षक यांस, बाष्पकाच्या योग्य परिरक्षणाबाबत व सुरक्षिततेच्या दृष्टीने त्याचा वापर करण्यासंबंधी मालकांस, त्यास योग्य वाटेल असा सल्ला देता येईल.

(७) मुख्य निरीक्षक व सर्व उपमुख्य निरीक्षक व निरीक्षक हे, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक म्हणून समजले जातील.

**नोंदणी न झालेल्या किंवा प्रमाणित नसलेल्या बाष्पकाचा वापर**

६. हया अधिनियमात अन्यथा स्पष्टपणे जी कोणतीही तरतूद केली असेल ती खेरीज करुन, बाष्पकाचा कोणताही मालक, --

(अ) हया अधिनियमाच्या उपबंधानुसार बाष्पकाची नोंदणी केलेली असल्याशिवाय,

(ब) एका राज्यातून दुस-या राज्यात हस्तांतरित केलेल्या कोणत्याही बाष्पकाच्या बाबतीत, अशा हस्तांतरणाबाबत विहित केलेल्या रीतीने प्रतिवेदन देण्यात येईपर्यंत,

(क) हया अधिनियमान्वये बाष्पकाचा वापर करण्याबाबत ज्याद्वारे प्राधिकार देण्यात

करण्याबाबत प्रतिवेध.

आला आहे असे प्रमाणपत्र किंवा तात्पुरते प्रमाणपत्र, त्या वेळी अंमलात असल्याशिवाय,
(ड) अशा प्रमाणपत्रात किंवा तात्पुरत्या प्रमाणपत्रात नमूद केलेल्या कमाल दाबापेक्षा अधिक दाबात.

(इ) जर राज्य शासनाने बाष्पके ही [1](कार्यनिपुणता व क्षमता याबाबतची प्रमाणपत्रे) धारण करणा-या व्यक्तींच्या प्रभारात असावीत, असे नियम केले असतील तर, अशी बाष्पके नियमानुसार आवश्यक असलेले प्रमाणपत्र धारण करणा-या व्यक्तीच्या प्रभारात असल्याशिवाय,

त्याचा वापर करणार नाही किंवा वापर करण्याची परवानगी देणार नाही.

परंतु, हयाद्वारे निरसित केलेल्या कोणत्याही अधिनियमान्वये नोंदणी केलेले किंवा यथास्थिती, नोंदणी केलेले किंवा प्रमाणित केलेले बाष्पक असल्याचे समजले जाईल.

[2] * * * * * *

नोंदणी

७. (१) हया अधिनियमाच्या उपबंधान्वये ज्याची नोंदणी झालेली नाही अशा कोणत्याही बाष्पकाच्या मालकास, बाष्पकाची नोंदणी करुन घेण्यासाठी निरीक्षकाकडे अर्ज करता येईल. अशा प्रत्येक अर्जासोबत विहित केलेली फी भरण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये अर्ज मिळाल्यानंतर निरीक्षक, बाष्पकाच्या तपासणीसाठी अर्ज मिळाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत किंवा विहित करण्यात येईल अशा कमीतकमी कालावधीत बाष्पकाच्या तपासणीसाठी तारीख निश्चित करील व अशा रीतीने निश्चित केलेल्या तारखेबाबत बाष्पकाच्या मालकास, दहा दिवसांपेक्षा कमी होणार नाही अशी नोटीस येईल.

(३) उक्त तारखेस निरीक्षक, बाष्पकाचे मोजमाप व त्याची तपासणी करण्याची कार्यवाही करील व अशा बाष्पकाचा ज्या कमाल दाबापर्यंत (काही असल्यास) वापर करता येईल तो कमाल दाब विहित केलेल्या रीतीने निर्धारित करील व तपासणीच्या निष्कर्षाचे प्रतिवेदन विहित केलेल्या नमुन्यात मुख्य निरीक्षकाकडे पाठवील.

[1] हे शब्द, १९६० चा अधिनियम क्रमांक १८, कलम ६ अन्वये क्षमता प्रमाणपत्र शब्दाऐवजी दाखल करण्यात आले.

[2] हे परंतुक, १९३९ चा अधिनियम क्रमांक ३४ कलम ३ व अनुसूची २, अन्वये निरसित करण्यात आले.

(४) , प्रतिवेदन मिळाल्यानंतर ---

(अ) एकतर बाष्पकाची ताबडतोब नोंदणी करता येईल व त्यास नोंदणी क्रमांक देता येईल किंवा बाष्पकात किंवा त्यास जोडण्यात आलेल्या कोणत्याही बाष्पनलिकेत त्यास आवश्यक वाटत असतील असे मुख्य निरीक्षकास रचनात्मक फेरबदल, वाढ किंवा त्याचे नवीकरण करण्यात आले आहे याबाबत खात्री करुन घेतल्यानंतर त्यास त्यांची नोंदणी करता येईल व नोंदणी क्रमांक देता येईल, अथवा

(ब) त्यास बाष्पकाची नोंदणी करण्यास नकार देता येईल,

परंतु जर मुख्य निरीक्षक बाष्पकाची नोंदणी करण्यास नकार देईल तर, तो त्याचा नकार त्याबाबतच्या कारणासहीत ताबडतोब बाष्पकाच्या मालकास कळवील.

(५) बाष्पकाची नोंदणी केल्यावर मुख्य निरीक्षक, बाष्पकाच्या मालकास, बारा महिन्यातुन अधिक होणार नाही अशा कालावधीपर्यत व त्यास योग्य वाटेल अशा कमाल दाबाहून अधिक होणार नाही इतक्या दाबापर्यत हया अधिनियमान्वये केलेल्या विनियमानुसार, बाष्पकाचा वापर करण्यासाठी विहित केलेल्या नमुन्यात प्रमाणपत्र देण्याबद्दल आदेश देईल.

१(परंतु मितोपयोजक किंवा २ ( उष्णता देण्यासाठी तेल, अस्फाट किंवा डांबर यांचाच मुख्यत्वे उपयोग करुन त्या प्रक्रीया संयंत्राव्दारे (प्रोसेसिंग प्लॅट ) बाष्पनिर्मिती करण्यात येते त्या प्रक्रीया सयंत्राचा एक अविभाज्य भाग असलेले अप्रज्वलित बाष्पक ) यांच्याबाबतीत हया पोट कलमान्वये देण्यात आलेल्या प्रमाणपत्रावर चोविस महिण्यापेक्षा अधिक होणार नाही एवढया कलाावधीत त्याचा वापर करण्याचा प्राधिकार देता येईल )

(६) निरीक्षक, बाष्पकाच्या मालकास तात्काळ मुख्यनिरीक्षकांचे आदेश कळवील व त्यानुसार जे प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश देण्यात आला असेल असे कोणतेही प्रमाणपत्र मालकास देईल, आणि बाष्पकाची नोंदणी झालेली असेल तेथे मालक, विहित केलेल्या कालावधीत व विहित केलेल्या रितीने त्यावर नोंदणी क्रमांक कायमपणे चिन्हांकीत करण्याची व्यवस्था करील.

८. (१) बाष्पकाचा वापर करण्याबाबत ज्याव्दारे प्राधिकार दिला असेल ते प्रमाणपत्र खालील प्रमाणपत्राचे नवीकरण बाबतीत अमलात असणार नाही.

(अ) ज्या कालावधीसाठी ते देण्यात आले असेल तो कालावधी समाप्त झाल्यावर, अथवा

(ब) बाप्पकास कोणताही अपघात झाला असेल तेव्हा, अथवा

(क) बाष्पक हलविण्यात आल्यास, म्हणजे जे बाष्पक उदग्र नसेल व ज्याचा उष्णता द्यावयाचा पृष्ठभाग ( १८.५८ चौरस मिटर ) पेक्षा कमी असेल किंवा जे बाष्पक हातवाही किंवा वाहनावरुन नेता येण्याजोगे असेल तर, असे बाष्पक हलविण्यात आल्यास, अथवा

(ड) बाष्पकात कोणतेही संरचनात्मक फेरफार केले असतील, त्यात वाढ केली असेल किंवा त्याचे नवीकरण केले असेल अथवा

(इ) बाष्पकाशी जोडलेल्या कोणत्याही बाष्पनलिकेत कोणतेही संरचनात्मक फेरफार केले असता, त्यात भर घातली असता किंवा त्याचे नवीकरण केले असता जर मुख्य निरीक्षक कोणत्याही प्रकरणी तसे निर्देश देईल तर, अथवा

( फ) बाष्पक किंवा त्यास जोडलेली कोणतेही बाष्पनलिका ही धोकादायक परिस्थितीत असल्याचा कारणवरुन त्यांच्या वापरास प्रतिबंध करण्याबाबत मुख्य निरीक्षक किंवा निरीक्षण यांचा आदेश बाष्पकाच्या मालकास कळविण्यानंतर

(२) पोट-कलम (१) मधील खंड (फ) अन्वये आदेश दिला असेल तर आदेशासोबत, ज्या कारणामुळे आदेश देण्यात आला असेल ती कारणे मालकास कळविण्यात आली पाहिजेत.

(३) ऐखादे प्रमाणपत्र अमलांत नसेल त्यावेळी बाष्पकाच्या मालकास, तो अर्जात विनिर्दिष्ट करील अशा बारा महिन्यापेक्षा अधिक होणार नाही अशा कालावधीसाठी त्या प्रमाणपत्राचे नवीकरण करण्याबाबत निरीक्षकांकडे अर्ज करता येईल.

परंतु ते पमाणपत्र जर मितोपयोजक किंवा उष्णता देण्यासाठी तेल, अस्फाट किंवा डांबर यांचा मुख्यत्वे उपयोग करुन ज्या प्रक्रीया संयंत्राव्दारे बाष्पनिर्मिती करण्यात येते त्या प्रक्रीया सयंत्राचा एक

अविभाज्य भाग असलेले अप्रज्वलित बाष्पक याच्याशी संबधीत असेल तर त्यास चोवीस महिन्यापेक्षा अधिक होणार नाही अशा कालावधीकरीता त्याच्या नवीकरणासाठी अर्ज करता येईल.)

(४) पोट-कलम (३) अन्वये केलेल्या अर्जासोबत विहित केलेली फी दिलेली असावी व अर्ज मिळाल्यावर निरीक्षक ती मिळाल्याचा तारखेपासुन तीस दिवसाच्या आत किंवा विहित करण्यात येईल अशा कमीतकमी कालावधीत बाष्पकाच्या तपासणीची तारीख ठरवील व बाष्पकाच्या मालकास अशा ठरविलेल्या तारखेबाबतची दहा दिवसांपेक्षा कमी होणार नाही अशी नोटीस देईल,

परंतु कोणतेही संरचनात्मक फेरफार वाढ किंवा नवीकरण केल्याच्या कारणामूळे प्रमाणपत्र अमलात राहिले नसल्यास मुख्य निरीक्षकास कोणत्याही फी ची रक्कम सोडून देता येईल.

( तसेच मितोपयोजक किंवा उष्णता देण्यासाठी तेल अस्फाल्ट किंवा डांबर यांचा मुख्यत्वे उपयोग करुन ज्या प्रक्रीया संयंत्राव्दारे बाष्पनिर्मिती करण्यात येते त्या प्रक्रीयासत्राचा एक अविभाज्य भाग असलेले अप्रज्वलीत बाष्पक याच्या तपासणीसाठी ठरविलेली तारीख हि अर्ज मिळाल्याच्या तारखेपासुन साठ दिवसाच्या आतील असेल व मालकास अशा ठरविलेल्या तारखेबाबत तीस दिवसांपेक्षा कमी होणार नाही इतक्या दिवसांची नोटीस देण्यात येईल)

(५) उक्त दिवशी निरीक्षक, विहित केलेल्या रितीने बाष्पकाची तपासणी करील, आणि बाष्पक व त्यास सबध्द असलेली किंवा असलेल्या बाष्पनलिका सुस्थितीत असल्याबाबत जर त्याची खातरजमा झाली असेल तर, तो बारा महिन्यांपेक्षा अधिक होणर नाही अशा कालावधीपर्यंत व हया अअधिनियमान्वये केलेल्या विनियमांचा व त्यास योग्य वाटेल अशा कमाल दाबापेक्षा अधिक होणार नाही अशा दाबावर बाष्पकाचा वापर करु देण्याबाबत प्राधिकार देणारे नवीकृत प्रमाणपत्राव्दारे चोविस महिन्यापेक्षा अधिक होणार नाही अशा कालावधीकरीता त्यांचा वापर करण्याबाबत प्राधिकार देता येईल,

(तसेच) जर निरीक्षकाने

( अ) (१) अर्जात नमूद केलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीसाठी वैध असलेले अथवा (२) ज्या कमाल दाबावर बाष्पकाचा वापर करता येईल तो दाब वाढविण्याबाबत, किंवा कमी करण्याबाबत, कोणतेही प्रमाणपत्र देण्याचे योजिले असेल, अथवा

(ब) बाष्पक किंवा त्यांस संबध्द असलेल्या कोणत्याही बाष्पनलिकेत कोणतीही संरचनात्मक फेरफार करण्याचे, त्यात भर घालण्याचे किंवा त्याचे नवीकरण करण्याबाबत आदेश देण्याचे योजले असेल, अथवा

(क) बाष्पक वापरण्यायोग्य नाही असे त्याचे मत असेल, तर

निरीक्षक, त्याचे मत व त्याबाबतची कारणे तपासणी केल्यापासुन अठ्ठेचाळीस तासांच्या आत बाष्पकांच्या मालकास लेखी कळवील, आणि तो ते प्रकरण आदेशासाठी तात्काळ मुख्य निरीक्षकाकडे पाठाविल.

( ६) मुख्य निरीक्षकास, पोट कलम (५) अन्वये प्रतिवेदन मिळाल्यावर हया अधिनियमाच्या उपबंधास व त्यान्वये केलेल्या विनीयमास अधीन राहून, त्यास योग्य वाटेल अशा अटीवर व शर्तीवर, काही असल्यास प्रमाणपत्राचे नवीकरण करण्याचा आदेश देता येईल किंवा त्याचे नवीकरण करण्यास नकार देता येईल.
परंतु मुख्य निरीक्षक प्रमाणपत्राचे नवीकरण करण्यास नकार देईल तर तो त्याचा नकार त्याबाबतच्या कारणासहीत तात्काळ बाष्पकाच्या मालकास कळविल.

(७) हया कलमातील कोणत्याही मजकुरामुळे प्रमाणपत्रे असतांना कोणत्याही वेळी बाष्पकाच्या मालकास प्रमाणपत्राच्या नवीकरणासाठी अर्ज करण्यास प्रतिबंध होत असल्याचे समजले जाणार नाही.

९. कलम ७ चे पोट कलम ( ३) किंवा कलम ८ चे पोटकलम (५) अन्वये निरीक्षक कोणत्याही बाष्पकाच्या बाबतीत मुख्य निरीक्षकाकडे प्रतिवेदन पाठाविल व तर त्या बाष्पकाच्या वापरास कलम ८ चे पोट कलम (१) मधील खंड (फ) अन्वये मनाई करण्यात आली नसेल अशा प्रकारचे ते बाष्पक असेल तर मूख्य निरीक्षकाचे आदेश मिळेपर्यत निरीक्षकास, योग्य वाटेल अशा दाबावर व हया अधिनियमान्वये केलेल्या विनियमानुसार कमाल दाबापेक्षा अधिक होणार नाही अशा दाबाबवर बाष्पकाचा वापर करण्याबाबत बाष्पकाच्या मालकास तात्पुरते प्रमाणपत्र देता येईल अशा प्रकारचे तात्पुरते प्रमाणपत्र

(अ) ते ज्या तारखेस देण्यात आले असेल त्या तारखेपासून सहा महिने पूर्ण झाल्यावर किंवा

(ब) मुख्य निरीक्षकाचे आदेश मिळाल्यावर किंवा

(क) कलम ८ मधील पोट कलम (१) यातील खंड (ब), (क),(ड), (इ) आणि (फ) यात उल्लेखिलेल्या कोणत्याही याबाबतीत,

अमलात राहणार नाही व अशा रितीने ते अमलात असण्याचे बंद झाल्यानंतर ते निरीक्षकांकडे परत करण्यात येईल.

१०. (१) यात यापुर्वी काहिहि असले तरी बाष्पकासंबधीच्या प्रमाणपत्राची मुदत संपली असेल तर मालकास अर्जावर आदेश होईलपर्यत पुर्वी देण्यात आलेल्या प्रमाणपत्रात निर्दिष्ट केलेल्या देईपर्यत दाबावर बाष्पकाचा वापर करण्याचा हक्क राहिल परंतु त्याने त्या प्रमाणपत्रांच्या नवीकरणासाठी अशी मुदत संपण्यापुर्वी अर्ज केलेला असला पाहिजे.

(२) पोट कलम (१) मधील कोणत्याही मजकुरामुळे कलम ८ मधील पोट कलम (१) यातील खंड (ब),(क), (ड) (इ) आणि (फ) यात उल्लेखिलेल्या कोणत्याही बाबतीत प्रमाणपत्राची मुदत संपल्यानंतर बाष्पकाचा वापर करण्याबाबत प्राधिकार प्राप्त होत असल्याचे समजले जाणार नाही.

११. मुख्य निरीक्षकास कोणत्याही वेळी कोणतेही प्रमाणपत्र किंवा तात्पुरता आदेश निरीक्षकांच्या प्रतिवेदनावरुन किंवा अन्यथा खालील कारणावरुन म्हणजेकृ

(अ) जर ते प्रमाणपत्र किंवा तात्पुरते प्रमाणपत्र हे लबाडीने मिळविले आहे किंवा ते चुकीने अथवा पुरेशी तपासणी न करता देण्यात आले आहे असे त्यास सकारण वाटत असेल तर, किंवा

(ब) ज्या बाष्पकासंबधी प्रमाणपत्र किंवा तात्पुरते प्रमाणपत्र देण्यात आले असेल त्या बाष्पकास हानी पोहोचली असेल किंवा ते दूरुस्त असस्थेत नसेल तर किंवा

(क) बाष्पके, कार्यनिपुणता व क्षमता प्रमाणपत्रे धारण करणा-या व्यक्तीच्या स्वाधीन असण्याच्या आवश्यकतेबाबत राज्य शासनाने नियम केले असतील व जर बाष्पक अशा नियमानुसार आवश्यक असलेले प्रमाणपत्र धारण न करणा-या व्यक्तीच्या स्वाधीन असेल तर, किंवा

करण्यात आले नसतील तर त्या बाबतीत मुख्य निरीक्षकाच्या मते बाष्पकाच्या स्थितीचा विचार करता, (ड) असे नियम तो ज्या व्यक्तीच्या प्रभाराखाली आहे ती व्यक्ती ते आपल्या प्रभारात ठेवण्यास सक्षम नसेल तर ; असे प्रमाणपत्र किंवा तात्पुरते प्रमाणपत्र परत मागे नेता येईल किंवा रद्द करता येईल.

परंतू, जर मुख्य निरिक्षक खंड (ड) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कारणावरुन प्रमाणपत्र किंवा तात्पुरते प्रमाणपत्र परत मागे घेईल किंवा रद्द करील तर ते प्रमाणपत्र परत घेण्याबाबतची किंवा रद्द करण्याबाबतची आपली कारणे बाष्पकाच्या मालकास लेखी कळवील, आणि ती अशा रीतीने कळविल्यापासून तीस दिवसांपर्यंत असे आदेश परिणामक्षम असणार नाही.

बाष्पकातील फेरफार व त्याचे नवीकरण.

१२. हया अधिनियमान्वये नोंदणी केलेल्या कोणत्याही बाष्पकात, मुख्य निरिक्षकाने लेखी मंजुरी दिलेली असल्याशिवाय कोणतेही सरंचनात्मक फेरफार, किंवा वाढ करता येणार नाही किंवा नवीकरण करता येणार नाही.

बाष्पनलिका मधील फेरफार व नवीकरण

१३. हया अधिनियमान्वये नोंदणी झालेल्या कोणत्याही बाष्पकाच्या मालकाने बाष्पकास जोडलेल्या कोणत्याही बाष्पनलिकेत कोणताही संरचनात्मक फेरफार करण्यापूर्वी किंवा त्यात वाढ करण्यापूर्वी किंवा त्याचे नवीकरण करण्यापूर्वी तो आपल्या उद्देशाचे प्रतिवेदन मुख्य निरीक्षकाकडे लेखी पाठवील. तसेच तो प्रतिवेदनाबरोबर योजिलेले फेरफार, वाढ किंवा नवीकरण याबाबतचा विहित करण्यात येईल असा तपशील सुद्धा पाठवील.

तपासणीच्या वेळचे मालकाचे कर्तव्य

१४. (१) बाष्पकाच्या तपासणीसाठी हया अधिनियमान्वये ठरविलेल्या कोणत्याही दिवशी बाष्पकाचा मालक पुढील गोष्टी करण्यास बांधलेला राहिल, त्या गोष्टी अशा :-

(अ) तपासणीसाठी निरिक्षकास लागणा-या योग्य त्या सर्व सोयी उपलब्ध करुन देणे व त्यास आवश्यक असलेली योग्य ती सर्व माहिती देणे ;

(ब) तपासणीसाठी विहित केलेल्या रीतीने बाष्पक योग्य रीतीने तयार करणे व तो तपासणीसाठी तयार ठेवणे; आणि

(क) बाष्पकाची नोंदणी करण्यासाठी अर्ज केला असेल तर अशा बाबतीत, विहित करण्यात येतील अशी रेखाचित्रे, विर्निदेश, प्रमाणपत्रे व इतर तपशील पुरविणे.

(२) जर मालक, योग्य कारणाशिवाय, पोट-कलम (१) मधील उपबंधाची अंमलबजावणी करण्यात कसूर करील तर, निरीक्षकास बाष्पकाची तपासणी करण्यास नकार देता येईल व तो ते प्रकरण मुख्य निरीक्षकाकडे पाठवील. मुख्य निरीक्षकास बाष्पकाची तपासणी करण्यास नकार देता येईल व तो ते प्रकरण मुख्य निरीक्षकाकडे पाठविल. मुख्य निरीक्षक, तद्‌विरुद्ध पुरेसे कारण दाखविल्याशिवाय, मालकास यथास्थिती, कलम ७ किंवा कलम ८ अन्वये नवीन अर्ज करण्यास फर्मावील, आणि कलम १० मध्ये काहीही असले तरी मुख्य निरीक्षकास बाष्पकाचा वापर करण्याबाबत मालकास मनाई करता येईल.

प्रमाणपत्रे

१५. बाष्पकासंबंधीचे प्रमाणपत्र किंवा तात्पुरते प्रमाणपत्र धारण करणारा कोणत्याही बाष्पकाचा

वगैरे दाखल मालक, सदर प्रमाणपत्र किंवा आदेश ज्या कालावधीपर्यंत अंमलात असेल त्या कालावधीत
योग्य करणे अशा कोणत्याही वेळेस, जिल्हा दंडाधिकारी, पोलिस आयुक्त किंवा त्यावेळी बाष्पक ज्या भागात

असेल त्या भागात अधिकारिता असलेलस प्रथम श्रेणी दंडाधिकारी किंवा भारतीय कारखाने अधिनियम, १९११ अन्वये नियुक्त केलेला कोणताही निरीक्षक, याने किंवा जिल्हाधिकारी अथवा पोलिस आयुक्त यांनी विशेषरीत्या लेखी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीने त्यास फर्माविले असता, सदर प्रमाणपत्र अथवा तात्पुरते प्रमाणपत्र दाखल करण्यास बांधलेला राहील.

प्रमाणपत्रे वगैरेचे

१६. जर बाष्पकांसंबंधीचे प्रमाणपत्र किंवा तात्पुरते प्रमाणपत्र ज्या कालावधीसाठी अंमलात असेल त्या कालावधीत एखादी व्यक्ती बाष्पकाचा मालक होईल तर पूर्वीचा मालक अशा व्यक्तीस सदरहू हस्तांतरण प्रमाणपत्र किंवा तात्पुरते प्रमाणपत्र देण्यास बांधलेला असेल.

---------------------------------------------------------------------------------------------------------------
--

पहा कारखाना अधिनियम, १९४८ (१९४८ चा अधिनियम क्रमांक ६३)



प्रवेश करण्या-बाबतचा अधिकार

१७, . निरीक्षकास बाष्पकाचे किंवा त्यास जोडलेल्या कोणत्याही बाष्पनलिकेचे निरीक्षण किंवा तपासणी करण्याच्या प्रयोजनासाठी किंवा हया अधिनियमांचे कोणतेही उपबंध किंवा तदन्वये केलेले कोणतेही विनियम किंवा नियम याचे पालन करण्यात आले आहे किंवा करण्यात येत असल्याबद्द खात्री करुन घेण्यासाठी, ज्या क्षेत्रासाठी त्याची नियुक्ती झाली असेल व ज्या क्षेत्रात बाष्पकाचा वापर करण्यात येत असल्याचे त्यास सकारण वाटत असेल अशा क्षेत्रातील कोणत्याही जागी किंवा कोणत्याही इमारतीत योग्य अशा कोणत्याही वेळी त्यास प्रवेश करता येईल.

अपघाता-बाबत प्रतिवेदन देणे

१८. (१) जर बाष्पकास किंवा बाष्पनलिकेस कोणताही अपघात झाला तर बाष्पकाचा किंवा बाष्पनलिकेचा मालक किंवा प्रभारी व्यक्ती अपघात घडल्यापासून चोवीस तासांच्या आत त्याबाबत निरीक्षकाकडे लेखी प्रतिवेदन पाठवील. अशा प्रत्येक प्रतिवेदनात, अपघाताचे स्वरुप व त्यामुळे बाष्पकास, बाष्पनलिकेस किंवा कोणत्याही व्यक्तीस काही हानी

पोचली असेल तर त्याबाबतचे यथार्थ वर्णन नमूद करण्यात येईल, प्रतिवेदनातील माहीती निरीक्षकास अपघाताच्या गांर्भियाचे आकलन होईल इतपत तपशीलवारपणे असली पाहिजे.

(२) प्रत्येक व्यक्तील अपघाताचे कारण , स्वरुप किंवा मर्यादा याबाबतीत निर्रीक्षकाने लेखी स्रुपात विचारलेल्या प्रत्येक प्रशनराचे आपल्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरे उत्तर देण्यास बांधलेली असेल.

मुख्य निरीक्षकाकडे अपील करणे.

१९. (अ) निरीक्षकाने, हया अधिनियमान्वये किंवा तदनुसार त्यास प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही शक्तीचा वापर करुन दिलेल्या आदेशामुळे किंवा जो दिला असल्याचे अभिप्रेत असेल अशा आदेशामुळे, अथवा

(ब) हया अधिनियमान्वये किंवा तदनुसार निरीक्षकाने जो आदेश काढणे किंवा प्रमाणपत्र देणे आवश्यक असेल तो आदेश काढण्यास किंवा प्रमाणपत्र देण्यास नकार दिल्यामुळे, आपल्यावर अन्याय झाला आहे असे समजणा-या कोणत्याही व्यक्तीस, ज्या तारखेस असा आदेश किंवा नकार त्यास कळविण्यात आला त्या तारखेपासून तीस दिवसांचे आंत, आदेशाविरुध्द मुख्य निरीक्षकाकडे अपील करता येईल.

अपील प्राधिका-याकडे अपील करणे.

२०. मुख्य निरीक्षकाच्या ज्या मूळ किंवा अपीलीय आदेशान्वये,--

(अ) बाष्पकाची नोंदणी करण्यास किंवा बाष्पकाचे प्रमाणपत्र देण्यास किंवा त्याचे नवीकरण करण्यास नकार दिलि असेल अथवा

(ब) ज्या संपूर्ण मुदतीसाठी अर्ज केला असेल त्या मुदतीत वैद्य असलेले प्रमाणपत्र देण्यास नकार दिला असेल, अथवा

(क) इच्छेनुसार कमाल दाबावर बाष्पकाचा वापर करण्याब ाबत प्राधिकार देणारे प्रमाणपत्र देण्यास नकार दिलि असेल, अथवा

(ड) प्रमाणपत्र किंवा तात्पुरते प्रमाणपत्र मागे घेतले किंवा रद्द केले असेल१ अथवा

(इ) कोणत्याही प्रमाणपत्रात विनिर्दिष्ट केलेल्या दाबाचे प्रमाण कमी केले असेल

किंवा ज्या मुदतीसाठी प्रमाणपत्र देण्यात आले असेल ती मुदत कमी केली असेल, अथवा

(फ) बाष्पक किंवा बाष्पनलिका यातील किंवा यासंबंधीचे कोणतेही संरचनात्मक फेरफार, जोडकाम किंवा नवीकरण करण्याबाबत आदेश दिला असेल किंवा बाष्पकात कोणतेही संरचनात्मक फेरफार जोडकाम, किवा नरवीकरण कराण्याबाबतची मंजूरी देण्यास नकार दिला असेल अशा आदेशामुळे,

आपल्यावर अन्याय झाला आहे असे समजणा-या कोणत्याही व्यक्तीस, असा आदेश त्यास कळविण्यांत आल्यापासून तीस दिवसांच्या आंत, मुख्य निरीक्षकामार्फत हया अधिनियमान्वये राज्य शासन नेमील अशा अपील प्राधिका-याकडढे अपील करता येईल.

अपील प्राधिका-याच्या आदेशात सुधारणा करण्याची केंद्र शासनाची शक्ती.

(२०अ. (१) हया अधिनियमान्वये केलेल्या विनियमांशी बाष्पक अनिुरुप नसल्याच्या कारणावरुन कलम २० अन्वये बाष्पकाची नोंदणी न करणे किंवा त्याबाबत प्रमाणपत्र न देणे किंवा त्याचे नवीकरण न करणे याबाबत दिलेल्या आदेशात हस्तक्षेपा करण्यास नकार देणा-या अपील प्राधिका-याच्या आदेशामुळे आपल्यावर अन्याय झाला आहे असे समजणा-या कोणत्याही व्यक्तीस त्यास असा आदेश कळविल्यिापासून दोन महिन्याच्या आत, अन्य देशात असे बाष्पक वापरात असल्याचा आधार घेऊन त्या आदेशात सुधासरण करण्यासाठी केंद्र शासनाडिे अर्ज करता येईल.

(२) असा अर्ज मिळाल्यानंतर केंद्रि शासनास, अपील प्राधिका-याकडून संबंधित अभिलेख व इतर माहिती मागविल्यानंतर व अर्जावरील त्या प्राधिका-याचे कोणतेही अभिप्राय असल्यास ते विचारात घेतल्यानंतर केंद्र शासनास त्यास आवश्यक वाटेल असा तांत्रिक सल्ला घेतल्यानंतर, अर्जासंबंधी योग्य वाटेल असा आदेश काढता येईल, आणि पुनरीक्षणास मान्यता दिली असेल त्याबाबतीत, अशा आदेशात बाष्पकाचील तपासणी करतांना हया अधिनियमाखालील विनियमापासून त्यात ज्या अटीवर व शर्तीवर फेरबदल केले जातील त्या अटी व शर्ती विनिर्दिष्ट केल्या जातील.

(२१. कलम २०अ अन्वये केंद्र शासनाने दिलेला आदेश आणि, कलम १९, २०

आदेशाची अंतिमता.

व २०अ मध्ये अन्यथा उपबंधित केले असेल त्याव्यतिरिक्त, अपील प्राधिकारी, किंवा मुख्य निरीक्षक, किंवा उप मुख्यनिरीक्षक, किंवा निरीक्षक यांचा आदेश अंतिम असेल व त्यावर कोणत्याही न्यायालयात हरकत घेतली जाणार नाही).

२२. बाष्पकाचा जो कोणताही मालक, --

किरकोळ शक्ती

(१) कलम ९ अन्वये अपेक्षित असल्याप्रमाणे तात्पुरते प्रमाणपत्र परत करण्यास , अथवा

(२) कलम १७ अन्वये फर्माविण्यात आले असता, प्रमाणपत्र किंवा तात्पुरते प्रमाणपत्र सादर करण्यास, अथवा.

(३) कलम १६ अन्वये अपेक्षित असल्याप्रमाणे, बाष्पकाच्या नवीन मालकास प्रमाणपत्र किंवा तात्पुरते प्रमाणपत्र देण्यांस,

नकार देईल किंवा वाजवी कारणाशिवाय त्याकडे दुर्लक्ष करील तर तो शंभर रुपयापर्यन्त दंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल.

बाष्पकाचा अवैधरित्या वापर करण्याबद्दल शक्ती

२३. ज्या बाष्पकाचा वापर करण्यासाठी ह्या अधिनियमान्वये प्रमाणपत्र किंवा तात्पुरते प्रमाणपत्र आवश्यक असेल अशा बाष्पकाचा जो कोणताही मालक, अंमलात असलेले असे कोणतेही प्रमाणपत्र किंवा तात्पुरते प्रमाणापत्र असल्याशिवाय किंवा, त्याद्वारे परवानगी दिलेल्या दावापेक्षा अधिक दाबावर, बाष्पकाचा वापर करीत तर तो पाचशे रुपयापर्यन्तच्या दंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल आणि, अपराध करणे सतत चालू असेल तर अशी शिक्षा झाल्यानंतर ज्या दिवसापर्यन्त अपराध करणे चालू ठेवण्यात आले त्या प्रत्येक दिवशी त्यास अतिरिक्त शंभर रुपयापर्यन्तच्या दंडाची शिक्षा होईल.

२४. जो कोणताही इसम --

ठतर शक्ती

(अ) एका राज्यातून दुस-या राज्यात स्थानांतरित करण्यात आलेल्या बाष्पकाचा जो मालक अशा स्थानांतरणाचे कलम ६ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे प्रतिवेदन न करता त्याचा वापर करील किंवा वापर करण्याची परवानगी देईल, अथवा

(ब) जर तो एखदया बाष्पकाचा मालक असेल आणि ह्या अधिनियमान्वये

बाष्पकास देण्यांत आलेला नोंदणी क्रमांक कलम ७ मधील पोट-कलम (६) अनुसार आवश्यक असल्याप्रमाणे त्या बाष्पकावर चिन्हांकित करवून घेण्यास कसून करील, अथवा

(क) कलम १२ अनुसार आवश्यकता असेल तर त्याप्रमाणे प्रथम मुख्य निरीक्षकाची पूर्वमंजूरी घेतल्या शिवाय बाष्पकात किंवा कलम १३ अन्वये आवश्यक असेल तर त्याप्रमाणे बाष्पनलिकेत प्रथम मुख्य निरीक्षकास न कळवता संरचनात्मक फेरफार करील, त्यात वाढ करील किंवा त्याचे नवीकरण करीत, अथवा

१.हे कलम, १९६० चा अधिनियम क्रमांक १८, कलम १० अन्वये दाखल करण्यात आले.

२.१९६०चा अधिनियम क्रमांक १८, कलम ११, अन्वये मूळ कलम २१ ऐवजी, हे कलम

दाखल करण्यात आले.

ड) कलम १८ अनुसार आवश्यक असल्याप्रमाणे बाष्पकास किंवा बाष्पनलिकेस झालेल्या अपघाताचे प्रतिवेदन देण्यास कसूर करील, अथवा

(इ) हया अधिनियमान्वये ज्या कमाल दाबावर बाष्पकाचा वापर करण्यास प्राधिकृत करण्यात आले असेल अशा कमाल दाबावर, त्याचा वापर करणे अशक्य होईल, अशा प्रकारे त्याच्या सुरक्षा झडपात बिघाड करील, ( अथवा

(फ) बाष्पकाचा इतर कोणत्याही बाष्पकाशी जोडलेल्या कोणत्याही वाफेच्या किंवा गरम पाण्याच्या प्रवाहाशी, किंवा इंधनाच्या टाकीशी असलेला संबंध विहित केलेल्या रीतीने पूर्णपणे तोडल्याशिवाय, या बाष्पकात दुस-या इसमास जाऊ देईल,)

तर ती व्यक्ती पाचशे रुपयांपर्यतच्या दंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल.

२७. (१) जी कोणतीही व्यक्ती, हया अधिनियमातील उपबंधानुसार किंवा याद्वारे निरसित केलेल्या कोणत्याही अधिनियमानुसार बाष्पकावर चिन्हांकित केलेला नोंदणी क्रमांक काढून नोंदणी

टाकील, त्यात फेरफार करील तो विरुप करील, नष्ट करील किंवा त्यात विघाड करील तर ती व्यक्ती पाचशे रुपयांपर्यन्त दंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल.

(२) जी कोणतीही व्यक्ती, हया अधिनियमान्वये किंवा याद्वारे निरसित केलेल्या कोणत्याही अधिनियमान्वये बाष्पकास जो नोंदणी कमांक देण्यात आला नसेल असा नोंदणी कमांक, लबाडीने बाष्पकावर चिन्हांकित करील तर तो दोन वर्षे कैदेच्या किंवा दंडाच्या किंवा दोन्ही प्रकारच्या शिक्षेस पात्र ठरेल.

चिन्हात बदल करण्याबाबत शास्ती

२६. हया अधिनियमान्वये किंवा तदनुसार शिक्षापात्र ठरलेल्या अपराधाबाबतचा कोणताही अभियोग, ज्या तारखेस अपराध केला सेल त्या तारखेपासून (चोवीस महिन्याच्या) आता असेल त्याव्यतिरिक्त, दाखल केला जाणार नाही आणि असा कोणजताही अभियोग मुख्य निरीक्षकाच्या पूर्वमंजुरीशिवाय दाखल केला जाणार नाही.

अभियोगा-बाबतची मर्यादा व त्यासाठी पूर्वमंजुरी

२७. हया अधिनियमान्वये किंवा तदनुसार शिक्षापात्र ठरलेल्या कोणज्त्याही अपराधाची न्याय चौकशी इलाखा शहर दंडाधिकारी किंवा प्रथम श्रेणी दंडाधिकारी यांच्या न्यायालयापेक्षा कनिष्ठ असलेल्या न्यायालयाकडून, केली जाणार नाही.

अपराधांची न्याय चौकशी

(२७ अ. (१) कलम २८ अनुसार प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करण्याकरिता, केंद्रीय बाष्पक मंडळ या नावे संबोधिण्यात येणा-या एका मंडळाची रचना करण्यात येईल).

(२) मंडळात पुढील सदस्यांचा अंतर्भाव होईल :-

(अ) केंद्र शासन, केंद्र शासित प्रदेश, रेल्वे, कोळसा उदयोग, भारतीय मानक संस्था, बाष्पक उत्पादन उदयोग आणि बाष्पकाचा वापर करणारे यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी आणि केंद्र सरकारच्या मते इतर ज्या हितसंबंधितांना मंडळावर प्रतिनिधित्व देणे आवश्यक वाटत असेल अशा हितसंबंधितांचे प्रति अध्यक्षांचा समावेश करुन अशा सदस्यांची संख्या पंधराहून अधिक असणार नाही.

केंद्रीय बाष्पक मंडळ

(ब) बाष्पकाचे निरीक्षण व त्याची तपासणी करण्याच्या कामात तज्ञ असलेला वरिष्ठ तांत्रिक अधिकारी). असा अधिकारी, (केंद्रशासित प्रदेश वगळता) प्रत्येक राज्याकडून नामनिर्देशित करण्यात येईल.

(३) मंडळातील रिकामे झालेले कोणतेही पद, पद रिकामे करणा-या सदस्यास ज्या प्राधिका-याने नामनिर्देशन केले असेल तो प्राधिकारी शक्य तो लवकर नामनिर्देशनाद्वारे भरील.

(४) मंडळास उपविधिद्वारा किंवा अन्यथा मंडळाची कार्यपध्दती, मंडळाकडून केल्या जाणा-या सर्व व्यवहाराचे स्वरुप, समित्यांची व उप-समित्यांची रचना, त्यांची सदस्य संख्या व मंडळास प्रदान केलेल्या कोणत्याही शक्तीचे व कार्याचे प्रत्यायोजन याबाबत नियमन करण्याची पूर्ण शक्ती राहील.

(५) मंडळात कोणतेही पद रिकामे असले तरीही मंडळास आपल्या शक्तींचा वापर करता येईल.

विनिमय करण्याची शक्ती.

२८. (मंडळास) भारत सरकारच्या राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारा पुढील ससर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी हया अधिनियमाशी सुसंगत असे विनियम करता येतील. ती प्रयोजने अशी :-

(अ) हया अधिनियमान्वये बाष्पकाची नोंदणी करण्याच्या व ते प्रमाणित करण्याााच्या प्रयोजनासाठी आवश्यक असेल ते साहित्य, संकल्पचित्र व रचना यासंबंधीच्या प्रमाणभूत शर्ती नमूद करणे ,

(अअ) ज्या परिस्थितीत, ज्या मर्यादेपर्यन्त व ज्या शर्तीस अधीन राहून खंड (अ) मध्ये नमूद केलेल्या प्रमाणभूत शर्तीपेक्षा वेगळे असे फेरबदल करण्यात येतील ती

परिस्थिती, त्या मर्यादा व शर्ती विहित करणे ,)

(ब) ज्या कमाल दाबावर बाष्पकाचा वापर करण्यात येईल तो कमाल दाब निर्धारित करण्याची पध्दती विहित करणे ,

(क) बाष्पकांच्या नोंदणीचे नियमन करण्यासाठी, त्यासाठी दयावयाची फीस व बाष्पकांच्या व त्यांच्या भागांच्या (निरीक्षणाकरिता व त्यांच्या तपासणीकरिता) दयावयाची फी, मालकाने सादर करावसयाची रेखाचित्रे, विनिर्देश, प्रमाणपत्रे व तपशील, तपासणीसाठी बाष्पक तयार करण्याची पध्दती, त्यावरील निरीक्षकाच्या प्रतिवेदनाचा नमुना, नोंदणी कमांक चिन्हांकित करण्याची पध्दती, आणि ज्या मुदतीत असा नोंदणी कमांक बाष्पकावर चिन्हांकित करावयाचा आहे ती मुदत विहित करणे ,

(ड) बाष्पकांचे व बाष्पनलिकेचे निरीक्षण व त्यांची तपासणी याबाबतचे नियमन करणे ,

(इ) बाष्पकाच्या आतील भागात काम करणा-या व्यक्तीच्या सुरक्षिततेबाबत खात्री करुन घेणे, आणि

(फ) (मंडळाच्या) मते जी बाब केवळ स्थानिक दृष्टीने किंवा राज्याच्या दृष्टीने महत्वाची नसेल अशा कोणत्याही इतर बाबीविषयीची तरतूद करणे.

नियम तयार करण्याची केंद्र शासनाची शक्ती.

(२८अ. (१) केंद्र शासनास, राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारा पुढील गोष्टीबाबत तरतूद करण्यासाठी नियम करता येतील.

त्या गोष्टी अशा :-

(अ) कलम २० अ, अन्वये अर्ज करताना अनुसरावयाची पध्दती व अश अर्जाच्या बाबतीत दयावयाची फी, आणि

(ब) कलम २७-अ, पोट-कलम (२) मधील खंड (अ) अन्वये सदस्यांच्या नामनिर्देशनाशी संबंधित असलेली कोणतीही बाब.

---

१. वरील अधिनियम कलम १४ अन्वये काही शब्द, कंस, अक्षर आणि संख्या वगळण्यात आल्या

२. पोट-कलह ४ च्या ऐवजी हे कलम वरील अधिनियमाच्या कलम १४ अन्वये दाखल करण्यात आलें.

३. गव्हर्नर जनरल इन कौन्सील ऐवजी हा मजकूर १९३७ चा अधिनियम क्रमांक ११, कलम ५ अन्वये दाखल करण्यात आला.

४. भारत शासनाचे राजपत्र हयात फेरबदल नाहीत ए.ओ. १९३७ पहा.

५. १९३७ चा अधिनियम क्रमांक ११, कलम ५ अन्वये हे दाखल करण्यात आले.

६. १९६० चा अधिनियम क्रमांक १८, कलम १५ अन्वये दाखल करण्यात आले.

७. १९६० चा अधिनियम क्रमांक १८, कलम १७ अन्वये दाखल करण्यात आले.

( (२) पोट-कलम १) अन्वये केलेला कोणताही नियम तो केल्यानंतर शक्य होईल तितक्या लवकर अधिवेशन चालू असताना संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, त्याच्या एका अधिवेशनातील किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनांतील एकूण तीस दिवसांच्या कालावधीसाठी ठेवण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्यानंतरचे लगतचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी जर नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत होईल किंवा नियमन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत होईल तर, तो नियम त्यानंतर यथास्थिती फेरबदल झालेल्या स्वरुपात अंमलात येईल किंवा तो अंमलात येणार नाही, परंतु त्यात अशी कोणतीही दुरुस्ती केल्यामुळे किंवा त्याचे विलोकन केल्यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या वैधतेस बाध येणार नाही,

२९. राज्य शासनास, राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेव्दारा पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी हया अधिनियमाशी किंवा तदन्वये केलेल्या विनियमांशी सुसंगत असे नियम करता येतील. ती प्रयोजने अशी :- नियम करण्याची शक्ती.

(अ) मुख्य निरीक्षक (उप मुख्य निरीक्षक) व निरीक्षक यांच्या अर्हता व त्यांची कामे विहित करणे, ते अनुक्रमे ज्या प्राधिका-याचे दुयम म्हणून राहतील ते प्राधिकारी विहित करणे किंवा त्यांची नेमणुक करणे आणि अशा प्राधिका-यांनी वापर करावयाच्या प्रशासनिक नियंत्रणाच्या मर्यादा विहित करणे

(ब) बाष्पकांच्या स्थानांतरणाचे नियमन करणे ,

(क) हया अधिनिमान्वये केलेल्या विनियमानुसार बाष्पकांची नोंदणी व प्रमाणन करण्यासाठी तरतूद करणे,

(ड) बाष्पके ( कार्यनिपुणता किंवा क्षमता याबाबतची प्रमाणपत्रे) धारण करण्या-या इसमांच्या प्रभाराखाली ठेवण्यासंबधी व ज्या शर्तीवर अशी प्रमाणपत्रे देण्यात येतील त्या शर्ती विहित करणे,
(इ) निरीक्षकांनी ज्या मुदतीच्या आत कलम ७ किंवा कलम ८ खाली बाष्पकाची तपासणी करावयास पाहिजे ती मुदत विहित करणे,
(फ) नवीकृत प्रमाणपत्रे देण्यासाठी देय असलेली फी विहित करणे, बाष्पके किंवा त्यांचे सुटे भाग किंवा बाष्पनलिकांची आरेखने यांचे निरीक्षण व तपासणी करण्यासाठी सांधात्याची चाचणी घेण्यासाठी, किंवा राज्य शासनाच्या मते ज्यासाठी वेळ व श्रम लागतात अशा इतर कोणत्याही बाबीसाठी फी विहित करणे आणि प्रत्येक प्रकरणात फीची रक्कम निश्चित करण्यासाठी कार्यपध्दती विहित करणे,
(ग) अपघातांबाबतच्या चौकशीचे नियमन करणे
(ह) कलम २० मध्ये उल्लेखिलेल्या अपील प्राधिका-यांची नेमणूक आणि त्यांच्या शक्ती व कार्यपध्दती निश्चित करणे,
(आय) हया अधिनियमान्वये बसविलेली फी, खर्च व शास्ती यांची विल्हेवाट लावण्याची पध्दत निश्वित करणे आणि
(जे) राज्य शासनाच्या मते जी बाब राज्यात केवळ स्थानिक महत्वाची असेल अशा कोणत्याही बाबीची सामान्यतः तरतूद करणे,

---

१.१९६० चा अधिनियम कमांक १८,कलम १७ अन्वये दाखल करण्यात आले.
२. "त्यांच्या वेतन,भत्ते आणि सेवेच्या शर्ती विनियमित करण्यासाठी" हे शब्द ए.ओ.१९३७ अन्वये वगळण्यात आले.
३ "क्षमता प्रमाणपत्र" च्या ऐवजी हा मजकूर १९६० चा अधिनियम कमांक १८, कलम १७ अन्वये दाखल करण्यात आला.
४ खंड (फ) च्या ऐवजी हा मजकूर १९६० चा अधिनियम कमांक १८, कलम १७ अन्वये दाखल करण्यात आला.
५ १९३७ विधि अनुकूलन आदेशान्वये हे परंतुक वगळण्यात आले,

नियमांचा भंग केल्याबदल व्यक्तीस, शास्ती,

३०. कलम २८ किंवा २९ अन्वये केलेल्या कोणत्याही विनियमाव्दारे किंवा नियमाव्दारे (असा निदेश देता येईल की, अशा विनियमाचे किंवा नियमाचे उल्लंघन करणा-या जर असे उल्लंघन पहिला अपराध असेल तर त्याबाबतीत ती व्यक्ती शंभर रुपयांपर्यतच्या, दंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल आणि नंतरच्या कोणत्याही अपराधाच्या बाबतीत एक हजार रुपयापर्यंत दंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल )

विनियम व आलेली

३१. (१) कलम २८ व २९ अन्वये विनियम व नियम करण्यासाठी प्रदान करण्यात

नियम या प्रसिध्द करणे. शक्ती असे नियम व विनियम त्यांचे पूर्व प्रकाशन केल्यानंतर केले जातील अटीस अधीन असेल.

(२) अशा रीतीने केलेले विनियम व नियम अनुक्रमे भारत सरकारच्या राजपत्रात व स्थानिक राजपत्रात प्रसिध्द करण्यात येतील, आणि अशा प्रकाशनानंतर, ते हया अधिनियमान्वये केलेले आहेत असे समजून परिणामक्षम असतील.

केद्रं शासनाची निदेश देण्याची शक्ती. (३१ अ केंद्र शासनास हया अधिनियमाचे उपबंध अंमलात आणण्यासाठी राज्य शासनास आवश्यक वाटतील असे निदेश देता येतील आणि राज्य शासन अशा निदशाचे पालन करील )

फी, वगैरेची वसुली. ३२. हया अधिनियमान्वये बसविलेली सर्व फी, खर्च व शास्ती जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करता येईल.

शासनाच्या बाबतीत ३३. अन्यथा स्पष्टपणे उपबंधित केले असेल ते बेरीज करुन, हा अधिनियम शासनाच्या मालकीच्या बाष्पकांना व बाष्पनलिकांना लागू होईल.

सुट ३४. (१) राज्य शासनास राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेव्दारा, इमारतींना उष्णता देण्यासाठी किंवा गरम पाण्याचा पुरवठा करण्यासाठी प्रामुख्याने उपयोगात आणल्या जाणा-या कोणत्याही बाष्पकास किंवा कोणत्याही वर्गातील किंवा कोणत्याहि प्रकारच्या बाष्पकास त्यास योग्य वाटतील अशा शर्तीस व निर्बधास अधीन राहून, हया अधिनियमाच्या प्रवर्तनापासून सूट देता येईल )

(२) कोणत्याही निकडीच्या प्रसंगी राज्यशासनास सामान्य किंवा खास लेखी आदेशाव्दारे कोणतीही बाष्पके किंवा बाष्पनलिका, किंवा कोणत्याही वर्गातील बाष्पके किंवा बाष्पनलिका, किंवा कोणतेही बाष्पक किंवा बाष्पनलिका यांस हया अधिनियमाच्या सर्व किंवा काणत्याही उपबंधाच्या प्रवर्तनापासून सूट देता येईल.

(३) बाष्पकाचे साहित्य, संकल्पचित्र किंवा रचना व देशाची जलद औद्योगिक करण्याची गरज लक्षात घेता जर राज्यशासनाची तसे करण्याच्या आवश्यकते बाबत खात्री होईल तर, राज्य शासनास राजपत्राात प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेव्दारा व तीत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तीस व निर्बधास

अधीन राहून राज्यातील किंवा राज्याच्या कोणत्याही भागातील कोणत्याही विनिर्दिष्ट वर्गातील बाष्पकास किंवा बाष्पनलिकास हया अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही उपबंधापासून वगळता येईल.

३५. (अधिनियमांचे निरसन) निरसन अधिनियम,१९२७ (१९२७ चा अधिनियम क्रमांक १२) यातील कलम २ व अनुसूची, या अन्वये हे कलम निरसित करण्यात आले.

अनुसूची -- (निरसित केलेले अधिनियम) वरील अधिनियमातील कलम २ अन्वये निरसित केले

.............................................................................................................................................................

.......

१. १९६० चा अधिनियम क्रमांक १८, कलम १८ अन्वये काही शब्दाऐवजी हे दाखल करण्यात आले.
२. पोट कलम (२) हयात फेरबदल करण्यात आला नाही. विधी अनुकुलन आदेश १९३७ पहा
३. १९६० चा अधिनियम १८,कलम १९ अन्वये दाखल करण्यात आले.
४. मूळ कलम ३४ हे त्याच कलमाचे पोट कलम २ म्हणून पुनरांकित करण्यात आले आणि पोट-कलम १९२९ चा अधिनियम क्रमांक ९, कलम ३ अन्वये दाखल करण्यात आले.
५ पोट'कलम (२) च्या ऐवजी हा मजकूर १९६० चा अधिनियम क्रमांक १८,कलम २० अन्वये दाखल करण्यात आला.

# भारतीय बाष्पक अधिनियम, १९२३.

कलमे

२७. अपराधांची न्यायचौकशी.
२७अ. केंद्रीय बाष्पक मंडळ.
२८. विनियम करण्याची शक्ती.
२८अ. नियम तयार करण्याची केंद्र शासनाची शक्ती.
२९. नियम तयार करण्याची शक्ती.
३०. नियमांचा भंग केल्याबद्दल शास्ती.
३१. विनियम व नियम प्रसिध्द् करणे.
३१अ. केंद्र शासनाची निदेश देण्याची शक्ती.
३२. फी वैगरेची वसुली.
३३. शासनाच्या बाबतीत नियमाची प्रयोज्यता.
३४. सूट.
३५. (निरसित).
अनुसूची :- (निरसित)